महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा
**सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग)**
आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर,
आळंदी रोड, येरवडा, पुणे - ४११ ००६

सहसंचालक (वै) (०२०) २९७०५९५३
सहसंचालक (का) (०२०) २६६८६९५५
उपसंचालक (०२०) २६६८६९५१
कार्यालय (०२०) २६६८६९५२-५४

विभागवार ईमेल आयडी :-
TB Section - stomh@rntcp.org
Lep Section- jtlepnms@rediffmail.com
Est Section - jdhsest९९@gmail.com

आरोग्य सेवा

जा.क्र.ससंआसे/कुष्ठवक्षय/कक्षभांडार/बॅटरी/युपीएस/दरपत्रके/99063-65/२६
दिनांक 03/010/२०२६

## दरपत्रक सूचना (Quotation Notice)

**विषय - राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यालयीन दैनंदिन कामकाजास्तव नवीन UPS इन्व्हर्टर व नवीन बॅटरी खरेदी करणेसाठी दरपत्रके मागविणेबाबत.**

राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यालयीन दैनंदिन कामकाजासाठी नवीन UPS इन्व्हर्टर (०१ नग) आणि बॅटरी (०८ नग) खरेदी करावयाची आहे. त्याकरिता इच्छुक अधिकृत पुरवठादारांकडून मोहोरबंद पाकिटात दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तपशील खालीलप्रमाणे आहे:

| अ. क्र. | तपशील | नग | नवीन नग दर (GST सह) | जुन्या बॅटरीची बाय-बॅक किंमत (प्रति नग) | एकूण निव्वळ किंमत (सर्व करांसह व फिटिंगसह) | मेक व मॉडेल (Make & Model) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **180Ah C10 Tubular Battery** | ०८ | | (एकूण ६ नग) | | |
| २ | **Online UPS 72V (Capacity: _३_ KVA)** | ०१ | | --NA-- | | |

<u>अटी व शर्ती :</u>

१. कार्यालयाकडील जुन्या बॅटरी घेऊन जाण्याची व्यवस्था ही संबंधित पुरवठादार यांची राहील. त्यासाठी कोणतेही शुल्क अदा करण्यात येणार नाही.
२. कार्यालयाकडे Exide कंपनीच्या (१८०AH) क्षमतेच्या एकूण ०६ बॅटरी उपलब्ध आहेत. इच्छुक पुरवठादार प्रतिनिधींनी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून बॅटऱ्यांची व कक्षाची पाहणी करूनच दरपत्रक सादर करावे. दरपत्रकाच्या बंद पाकिटावर **युपीएस व इन्व्हर्टर बॅटरी दरपत्रक** असे नमूद करावे.
३. एकूण ८ नवीन बॅटरींच्या किंमतीतून, कार्यालयाकडील ६ जुन्या बॅटरींची किंमत वजा करून येणारी निव्वळ रक्कम (Net Amount) दरपत्रकामध्ये नमूद करावी
४. नवीन युपीएस व बॅटरी यांची जोडणी करुन देण्याची जबाबदारी ही पुरवठादार यांची राहील. त्यासाठी अतिरिक्त शुल्क अदा करण्यात येणार नाही.
५. पुरवठा करण्यात आलेल्या नवीन UPS आणि बॅटरीसाठी किमान ३ वर्षांची ऑन-साइट रिप्लेसमेंट वॉरंटी असणे आवश्यक आहे. वॉरंटी काळात बिघाड झाल्यास पुरवठादाराने २४ तासांच्या आत दुरुस्ती किंवा बदली करून देणे बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

६. सादर केलेले दर हे दरपत्रक उघडल्याच्या दिनांकापासून किमान ६ महिन्यांपर्यंत (१८० दिवस) वैध राहतील अथवा पुढील आदेशापर्यंत वैध राहतील. सदर कालावधीत कार्यालयास याच प्रकारचे साहित्य पुन्हा खरेदी करावयाचे झाल्यास, पुरवठादाराने दरपत्रकात नमूद केलेल्या त्याच दराने, त्याच अटी व शर्तीनुसार आवश्यकतेनुसार साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

७. खरेदी आदेश (Purchase Order) मिळाल्यापासून सात (०७) दिवसांच्या आत सर्व साहित्याचा पुरवठा व फिटिंग पूर्ण करणे आवश्यक आहे. विलंब झाल्यास आदेश रद्द करण्याचा अधिकार कार्यालयाकडे राहील.

८. साहित्याचा पुरवठा व यशस्वी इन्स्टॉलेशन झाल्यानंतर तसेच तसा अहवाल सादर झाल्यानंतरच देयकाची (Payment) अदायगी केली जाईल. कोणत्याही प्रकारचे आगाऊ प्रदान (Advance Payment) केले जाणार नाही.

९. दरपत्रकातील दरामध्ये दर सादर करताना सर्व प्रकारचे करांसहीत ((GST), वाहतूक खर्च, मजुरी आणि फिटिंग चार्जेस इ.) एकत्रित दर अंतर्भूत असावेत. याव्यतिरिक्त कोणताही अवांतर खर्च मान्य केला जाणार नाही.

१०. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे. अंतिम दिनांकानंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

११. इच्छुक पुरवठादारास शासकीय/निमशासकीय कार्यालय किंवा नामांकित संस्थांमध्ये संबंधित साहित्याचा पुरवठा करण्याचा किमान १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक असून, त्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र/खरेदी आदेश दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक राहील. (तसेच आवश्यकता भासल्यास मुळ प्रती सादर करणे बंधनकारक राहील.)

१२. पुरवठादाराचे/कंपनीचे पुणे शहर किंवा परिसरात अधिकृत सेवा केंद्र (Service Center) असणे अनिवार्य आहे, जेणेकरून वॉरंटी काळात आवश्यकता असेल त्यावेळी तातडीने ऑन-साइट सेवा देणे शक्य होईल. सेवा केंद्राचा (Service Center) सविस्तर पत्ता व संपर्क क्रमांक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

१३. दरपत्रकासोबत पुरवठादाराचे पॅनकार्ड (PAN) आणि जीएसटी (GST) नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१४. प्रस्तुत दरपत्रके या कार्यालयास स्वहस्ते किंवा टपालाद्वारे दिनांक १४/०७/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा पद्धतीने पाठवावीत. तदनंतर कार्यालयास प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(डॉ. राधाकिशन पवार),
सहसंचालक, आरोग्य सेवा,
(कुष्ठरोग व क्षयरोग) पुणे ६

प्रत - भांडार शाखा
प्रत - या कार्यालयाच्या सुचना बोर्डसाठी
प्रत - विभागाचे संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी (https://nhm.maharashtra.gov.in)

Scanned with OKEN Scanner